दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● शनिवार दि.६ जुलै २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक २४१ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

आजगाव परिसरावर पुन्हा मायनिंगच्या संकटाची थाप!

सिंधुदुर्ग । जिल्हाप्रतिनिधी

आजगाव परिसरावर पुन्हा मायनिंगचे संकट घोंघावत आहे. आजगाव परीसरातील गावात सोमवारी दिनांक ८ जुलैला जेएसडब्लु कंपनीद्वारे ड्रोनद्वारे मायनिंगचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. यासंदर्भात आजगाव ग्रामपंचायतीला ४ जुलै रोजी परवानगीसाठी कंपनीतर्फे पत्र प्राप्त झाले आहे. यापुर्वी मायनिंग टेस्टिंगसाठी कंपनीने आजगाव, धाकोरे, मळेवाड आदी ग्रामपंचायतीकडे परवानगी मागितली होती. मात्र, ग्रामसभा घेऊन टेस्टिंगला विरोध झाला होता. त्यामुळे वर्षभर हा विषय थंड बासनात पडला होता. परंतु,आता हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. गुरुवार ४ जुलै २०२४ रोजी साय ६ वाजता जिंदाल कंपनीचे अधिकारी मायनींग संदर्भात पत्र घेऊन ग्रामपंचायत ऑफिस मध्ये आले. त्या पत्रात असे नमूद आहे की मायनिंगसाठी ड्रोनने सर्व्हे करायची परवानगी कंपनीला महाराष्ट्र सरकारने तसेच जिल्हाधिकारी (कलेक्टर)सिंधुदुर्ग यांनी दिली आहे आणि ते सोमवार दिनांक ८ जुलै ते ३० जुलै कालावधीत ड्रोनने मायनिंग विषयक सर्व्हे -तपासणी करणार आहेत , ग्रामपंचायतने त्यांना कोणतीही परवानगी दिलेली नाही .तरीही त्यांचे म्हणणे आहे आम्ही ग्राम पंचायतची परवानगी मागायला आलो नाही फक्त सोमवार पासून सर्व्हे सुरू करीत आहोत याची माहिती ग्रामपंचायतला कळवीत आहोत. वरील पत्रात ८४० हेक्टर एवढी आजगाव ब्लॉकमधील जमीन महाराष्ट्र सरकार कंपनीला मायनिंगसाठी देणार आहे, त्यासाठी खनिज साठा किती आहे याची तपासणी करण्याबाबतचे हे पत्र आहे. अतिशय गंभीर असा हा विषय असून ८४० हेक्टर पैकी किती लोकांची जमीन, घरे, बागबागायत घेणार आहेत हे आज तरी सांगता येत नाही. संपूर्ण आजगाव गावावर आलेले हे संकट आहे. त्यामुळे सर्व ग्रामस्थांनी एकत्र येउन एकजुटीने निर्णय घेण्याची गरज आहे. सोमवारी होणाऱ्या या सर्व्हेबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी सर्व स्त्री -पुरुष ग्रामस्थांनी रविवार दिनांक ७ जुलै २०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता आजगाव, मराठी शाळा वाचनालय हॉल येथे सभेसाठी जमावे असे आवाहन करण्यात आले आहे.

याआधीही येथे मायनींग विषयक चाचणी करण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र येथील स्थानिक ग्रामस्थांकडून त्याला विरोध केला गेला होता. मायनिंगमुळे या क्षेत्रातील जमिनीचे तसेच परिसरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. कारण संभाव्य खनिज क्षेत्रामध्ये ड्रिलिंग होणार असून भविष्यात याचे परिणाम धोकादायक असल्याचं सांगत ग्राम स्थांकडून विरोध केला जात आहे. प्रशासनाने ग्रामस्थांना विश्वासात न घेता जर संबंधित खनिज प्रकल्पाला मान्यता दिल्यास तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल. तसेच कोणत्याही परिस्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास करणारा प्रकल्प होऊ देणार नाही. परिणामी आम्हाला आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला त्यावेळी होता. आता पुन्हा मायनिंगसाठी प्रयत्न चालू झाल्याने येथील वातावरण तापण्याची शक्यता आहे.

सावंतवाडी तालुक्यातील आजगाव, मळेवाड, धाकोरा, आरवली, आसोली, सोंसुरे, आरवली बांध, साखेलखोल ग्रामपंचायत हद्दीत खनिज प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. हा प्रकल्प पर्यावरणाला हानी पोहोचवणारा असून यामुळे परिसरातील भातशेती, काजू बागायतीचा ऱ्हास तसंच हानी होईल, अशी भावना व्यक्त करत गावकऱ्यांनी याला तीव्र विरोध केला आहे. आजगाव ग्राम पंचायत हद्दीत ११.४ किलोमीटर क्षेत्रफळावर खनिज कंपनीचा प्रकल्प उभारण्यासाठी, सर्वे क्षणाचं काम करण्यासाठी आजगाव ग्राम सभेकडून एनओसी मागण्यात आली होती. मात्र पूनर्वेक्षण करताना अनुदान क्षेत्रातील जमिनीचे तसेच परिसरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. कारण संभाव्य खनिज क्षेत्रामध्ये ड्रिलिंग होणार असून भविष्यात याचे परिणाम धोकादायक असल्याचं सांगत ग्रामस्थांकडून विरोध केला जात आहे. प्रशासनाने ग्रामस्थांना विश्वासात न घेता जर संबंधित खनिज प्रकल्पाला मान्यता दिल्यास तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल. तसेच कोणत्याही परिस्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास करणारा प्रकल्प होऊ देणार नाही. परिणामी आम्हाला आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

जेएसडब्लू कंपनीने शिरोडा मळेवाड

पान ३ वर...

थोडक्यात

कोलगाव तिठा मार्गे दाणोली रस्त्यावरील खड्डे त्वरीत बुजवा

वेंगुर्ले । वार्ताहर

वेंगुर्ला बेळगाव रोड कोलगाव तिठा ते बुर्डी पुल मार्गे दाणोली हा संपुर्ण रस्ता खड्डेमय होऊन खराब झालेला असल्यामुळे येत्या १५ दिवसात सदर रस्त्यावरील खड्डे तरी त्वरीत बुजवण्यात यावेत. कारण खड्डे वाचवण्याचा प्रयत्न करणा-यांना अपघातांना सामोरे जावे लागते त्यामुळे अपघात होऊन जिवीत व वित्त हानी होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे खड्डे बुजवण्याचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी माजी शिक्षण सभापती मंगेश तळवणेकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी यांच्याजवळ केली आहे.

सावंतवाडी बस स्थानक आठ दिवसात सुधारा

सावंतवाडी । प्रतिनिधी

बसस्थानकाची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. या परिसरात चिखलमय खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे.बस्थानकाच्या इमारतीवर झाडेझुडपे वाढली असून शौचालयात अस्वच्छता पसरली आहे .अशा या बस स्थानकाची तात्काळ पाहणी करून आणि येत्या आठ दिवसात हे बस स्थानक सुधारायला हवेत असे एसटी मंडळाचे जिल्हास्तरीय अधिकारी यांना माजी खासदार विनायक राऊत यांनी सूचना केल्या.यावेळी राऊत यांनी सावंतवाडी बस स्थानकाची पाहणी केली. यावेळी एकंदरीत बस स्थानक परिसराची पाहणी करून झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली.

पावसाळ्यात वाहने सांभाळून चालवा

बांदा । वार्ताहर

जून महिन्यात सर्व शाळा सुरू झाल्याने लहानलहान मुले रस्त्याच्या बाजूने शाळेत चालत जातात. त्यांना रस्ता सुरक्षेबाबत ज्ञान नसते. त्यामुळे सर्व वाहनचालकांनी वाहने सांभाळून चालवण्याचे आवाहन, दोडामार्ग पोलिस ठाण्याचे कॉन्स्टेबल विजय जाधव यांनी केले आहे. विजय जाधव म्हणाले की, पावसाळा असल्याने रस्त्यावरील पाणी विद्यार्थ्यांच्या अंगावर पडणार नाही याची खबरदारी वाहनचालकाने घ्यावी. तसेच अचानक लहान मुले रस्त्यावर आल्यास दुर्घटना होणार नाही याची काळजी घ्या. रस्ते निसरडे बनत आहेत त्यामुळे आपल्यासह दुसऱ्यांना त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन दोडामार्ग पोलिस कॉन्स्टेबल विजय जाधव यांनी वाहनचालकांना केले आहे.

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

दाभोली येथे विविध जातींच्या फणस झाडांची लागवड

वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर

जिल्हा कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी-सावंतवाडी, तालुका कृषी अधिकारी-वेंगुर्ला यांच्या हस्ते दाभोली येथील गुरूनाथ जोशी यांच्या बागायतीमध्ये विविध जातीच्या फणस झाडांची लागवड करण्यात आली. हा कार्यक्रम ३ जुलै रोजी पार पडला. यावेळी वेंगुर्ला तालुका कृषी अधिकारी प्रिया गुंड, कृषी सहाय्यक जीवन परब, जीजी नाईक, लाडू जाधव, देसाई, ग्रामसेवक पिगुळकर, प्रगतशील शेतकरी अण्णा जोशी, नंदन बांदवलकर, बाळा हळदणकर, विनायक बांदवलकर, उमेश जोशी, विवेक जोशी, बाळा राऊळ, संध्या गावडे आदी उपस्थित होते. उपस्थित

पान ३ वर...

गोव्यात व्यावसायासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील चालकांवर बॅचच्या नावावर कारवाई

सावंतवाडी । प्रतिनिधी

सिंधुदुर्गातील तरुणांना बॅचच्या नावावर साडे दहा हजाराचा दंड आकारण्याचा सुरू असलेला प्रकार गोवा शासनाकडून येत्या १५ दिवसात बंद करावा. ज्या प्रमाणे टोल मध्ये सुट दिली होती. तो निकष लावून तात्काळ योग्य तो निर्णय घ्यावा,अन्यथा गोव्याकडे जाणार्या गाड्या रोखू,असा इशारा आज गोव्यात चालक म्हणून काम करणार्या तरुणांनी दिला. दरम्यान याबाबत गोव्याच्या मुख्यमंत्र्यांशी बोलून योग्य तो निर्णय घेण्यास सांगू, असे आश्वासन माजी खासदार विनायक राऊत यांनी दिले. तर आपण आमदार जीत आरोलकर यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी अधिवेशनात हा प्रश्न मांडून कायमचा तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू,असे त्यांनी आश्वासन दिले आहे,असे ॲड. अनिल निरवडेकर यांनी सांगितले. गोव्यात व्यावसायासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील चालकांना बॅचच्या नावावर कारवाई केली जाते. यावेळी तुमच्याकडे लायसन नाही,असा रिमार्क मारुन त्यांना साडे दहा हजाराचा दंड केला जातो. गेले ४ ते ५ महिने हा प्रकार सुरु आहे. त्या ठिकाणी सिंधुदुर्गातील तब्बल ५००हून अधिक तरुण चालक म्हणून

पान ३ वर...

सातबारा आठ अ साठी शेतकऱ्यांची होतेय फरफट

सावंतवाडी । सुनिता भाईप

मडुरा व पाडलोस गावातील शेतकऱ्यांना कर्जाची उचल करताना आठ अ किंवा सातबारा मिळण्यासाठी अनेक दिवस तलाठ्याची वाट पहावी लागते. सद्यस्थितीत सातार्डा तलाठी यांच्याकडे मडुऱ्याचा चार्ज आहे. त्यामुळे ते केवळ दोन दिवस उपलब्ध असतात.

अन्य दिवशी शेतकरी, विद्यार्थी यांना तलाठ्याविना कागदपत्रांसाठी खेपा माराव्या लागतात. त्यामुळे मडुरा सजासाठी स्वतंत्र तलाठी द्यावा अशी मागणी मडुरा उपसरपंच बाळू गावडे यांनी सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील यांच्याकडे केली आहे.

मडुरा सजा तलाठी कार्यालयांतर्गत मडुरा व पाडलोस ही दोन गावे येतात. शेकडो शेतकरी मडुरा व पाडलोस विकास सोसायटी मधून कर्जाची उचल करतात. यासाठी सातबारा व आठची आवश्यकता आहे. परंतु कायमस्वरूपी तलाठी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची मात्र गैरसोय होते. दोन तीन किलोमीटर अंतरावरून येणाऱ्या शेतकऱ्यांना तलाठी नसल्याने

पान ३ वर...

आडवली येथील चिरेखाणीचे साहित्य चोरीला

आचरा । वार्ताहर

आडवली भटवाडी येथील दुर्गा प्रसाद गजानन तुळपुळे यांच्या चिरेखाणीवरील सुमारे २१६५००रुपयांची यंत्र सामग्री अज्ञाताने चोरुन नेण्याची घटना गुरुवारी ४जुलै रोजी उघडकीस आली.याबाबत अज्ञाताविरोधात आचरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्गा प्रसाद तुळपुळे यांनी आचरा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत पावसाळा हंगाम सुरू असल्याने जून महिन्यापासूनच चिरेखाण व्यवसाय बंद आहे. त्यामुळे आवश्यक ती यंत्र सामग्री चिरेखाणी लगत पत्र्याच्या शेडमध्ये ठेवण्यात आली होती. गुरुवारी चार जुलै रोजी नेहमी प्रमाणे सकाळी पुजेसाठी फुले काढायला गेलो असता. शेडला दक्षिण बाजूने लावलेले२५ते३० चिरे कुणीतरी अज्ञाताने काढलेले आढळून आले. संशय आला म्हणून पहाणी केली असता पॉवर टिलर,तीन कटींग मोटार, तीन वायरबंडलय, दोन कटींग ब्लेड, दोन डंपर स्टेपनी, स्क्रू ड्रायव्हर,आदी साहित्य,इण्डेन गॅस सिलिंडर आदी मिळून सुमारे २१६५००रुपये किंमतीचा माल चोरीस गेला. घटनेची

पान ३ वर...

दानोली ते आंबोली घाट रस्ताचे डांबरीकरणाचे पितळ पहिल्याच पावसात पडले उघडे

आंबोली । वार्ताहर

आंबोली घाट रस्ता हे भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे. कारण दोन महिन्यापूर्वी दानोली पासून आंबोली पर्यंत केलेले डांबरीकरण व त्यावर मजबुती करण्यासाठी जो नंतर सीलकोट दिलेला होता तो पहिल्याच पावसात उखडून गेला असून चतुर्थी पर्यंत संपूर्ण आंबोली घाट रस्ता हा खड्डेमय होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्या संगणमतानेच हा भ्रष्टाचार होत असल्याचे यातून स्पष्ट होत आहे. गेल्यावर्षी अगदी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच सावंतवाडी पासून दानोली पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण भर पावसात सुरू करण्यात आले होते. अवघ्या दीड दोन महिन्यातच ते डांबरीकरण उखडले व संपूर्ण रस्ता खड्डेमय झाला होता. हे उदाहरण समोर असताना देखील यावर्षी अगदी मे महिन्याच्या शेवटी दानोली पासून घाट रस्त्यात केलेल्या डांबरीकरणावर सिलकोट चे काम केले गेले. सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या या घाट रस्त्याने मोठ्या प्रमाणात मालवाहतूक तसेच बेळगाव कोल्हापूर तसेच पुणे मुंबईचे पर्यटक देखील या मार्गे

पान ३ वर...

कुडाळ रेल्वेस्थानकावर अनोळखी व्यक्तीचा सापडला मृतदेह

कुडाळ । प्रतिनिधी

कुडाळ रेल्वेस्थानकावर वरील प्लॅटफॉर्म क्र.२ वर ६५ वर्षीय अनोळखी पुरुष व्यक्तीचा मृतदेह गुरुवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आला. या मृतदेहाची ओळख सायंकाळी उशिरापर्यंत पटली नव्हती. याबाबतची खबर रेल्वे पोलीस प्रदीप रामवतार कुमार यांनी कुडाळ पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यू अशी नोंद केली आहे. गुरुवारी सकाळी रेल्वे पोलीस प्रदीप रामवतार कुमार कणकवली रेल्वे स्थानक येथे आपल्या ड्युटीवर आले. त्यानंतर सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास कुडाळ रेल्वे स्थानक मास्तर यांनी दूरध्वनीवरून त्यांना कुडाळ रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र.२ वर एक वृद्ध व्यक्ती झोपलेली असल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच प्रदीप कुमार येथील रेल्वे स्थानकावर आले. त्यांनी पाहणी केली असता, सदर व्यक्ती हालचाल करीत नव्हती. नंतर १०८ रुग्णवाहिका

पान ३ वर...

सोनुर्ली गावासाठी उभारण्यात आलेला बीएसएनएलचा टॉवर असून नसल्यासारखा

सोनुर्ली । वार्ताहर

सोनुर्ली गावासाठी उभारण्यात आलेला बीएसएनएल चा टॉवर असून नसल्यासारखा आहे या ठिकाणी बॅटरी बॅकअप नसल्याने हा टॉवर जास्त करून बंदच असतो टॉवर कडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याने ग्रामस्थातून नाराजी व्यक्त होत आहे.

सोनुर्ली गावासाठी पाच वर्षांपूर्वी बीएसएनएल चा टॉवर उभारण्यात आला. गावात नसलेली मोबाईलची रेंज या निमित्ताने आल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला मात्र हा आनंद काही महिन्यांसाठीच टिकला कारण या टॉवरसाठी आवश्यक असलेली बॅटरी बॅकअप केव्हाची चोरीला गेली असून बीएसएनएल अधिकाऱ्यांनाही याची कल्पना नाही या टॉवरसाठी आलेली इलेक्ट्रिक केबल अंडरग्राउंड नसल्याने ती वारंवार कट होऊन या टॉवर बंद पडतो तसेच लाईट गेल्यावरही टॉवर बंद होतो एकूणच हातावर असून नसल्यासारखा आहे टॉवरच्या परिसरात कुठल्याही प्रकारचे कंपाउंड किंवा डागबुजी केलेली नाही झाडाझुडपानी वेढलेल्या स्वरूपात हा टॉवर असून त्याकडे बीएसएनएलचे अधिकारी पूर्णतः दुर्लक्ष करत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या ठिकाणी जनरेटर बसवण्यात आला आहे परंतु त्यामध्ये डिझेल टाकून तो कधीच कार्यान्वित करण्यात आला नाही. केवळ निधी खर्च करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून

पान ३ वर...

गोव्यात वॉटर राफ्टिंग थरार; सप्टेंबरपर्यंत सुरु राहणार उपक्रम

पणजी । वार्ताहर

पावसाळ्यात नदीच्या पाण्याचा प्रवाह मोठा आणि गतिमान झालेला असतो, जो राफ्टिंगसाठी अतिशय योग्य असतो. त्यामुळे राफ्टिंगप्रेमी पावसाळ्याची वाट पाहत राहतात. राज्यात जून महिन्यात मुसळधार पाऊस एकदा सुरु झाला की ग्राफ्टिंगचा थरार अनुभवण्यासाठी तिथे पर्यटकांची आपोआपच रीघ लागते. गोव्यात पावसाळा सुरु झाला की पर्यटन, समुद्रकिनाऱ्यापासून गोव्याच्या अंतर्भागात वळते. गोव्याच्या पश्चिमेला असलेल्या डोंगरदऱ्या गर्द हिरवे रुप धारण करुन निमंत्रण देत असतातच. पश्चिम घाटाचा भाग असलेल्या डोंगरांची विविधता काय वर्णावी? गर्द रानात लपून असलेल्या तिथल्या कड्यांना या दिवसात झरे फुटतात, नद्या तुडुंब भरुन वाहत असतात, झाडे पाने पावसाच्या पाण्याने निथळून नखऱ्याने लकाकत असतात.

तिथल्या त्या सौंदर्याचा रस अनुभवण्यासाठी स्थानिक तसेच परराज्यातील पर्यटकांचा ओघ त्या दिशेला वळताना दिसतो.

पावसाळ्याच्या दिवसातील तिथले आणखीन एक आकर्षण म्हणजे वाळपई येथील नदीत सुरू होणारे व्हाईट वॉटर राफ्टिंग. पावसाळ्यात या नदीच्या पाण्याचा प्रवाह मोठा आणि गतिमान झालेला असतो, जो राफ्टिंगसाठी अतिशय योग्य असतो. त्यामुळे राफ्टिंग प्रेमी पावसाळ्याची वाट पाहत राहतात. राज्यात जून महिन्यात मुसळधार पाऊस एकदा सुरु झाला की ग्राफ्टिंगचा थरार अनुभवण्यासाठी तिथे पर्यटकांची आपोआपच रीघ लागते.

गोव्यात मोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. वाळपईच्या नदीत पाण्याचा जोरही वाढलेला आहे आणि त्यामुळे गेल्या सोमवारपासून

पान ३ वर...

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

एनडीए सरकारची विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याची नवीन पद्धत !

राहुल गांधी लीडर ऑफ द अपोजिशन यांनी इंडियाच्या वतीने राष्ट्रपती द्रौपदी मुरमू यांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या ऐवजी या देशातला युवा तरुण विद्यार्थी यांचा जो प्रश्न आहे त्याच्यावरती चर्चा व्हावी त्यासाठी फक्त दोन मिनिटं मिळावी असं सांगितलं पण माईक बंद करण्यात आला. विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याची जी काही नवीन पद्धत नवीन एनडीएचं सरकार आल्यानंतर २०१९ पासून नव्हे तर २०१४ पासूनच लोकसभेत आणि राज्यसभेत सुरू झाली. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला आभार प्रदर्शनाचं उत्तर देणं याच्या निमित्ताने तुम्ही काही बोला असं सभापती जरी म्हणत असले तरी वेगळी चर्चा करण्याचा लीडर ऑफ द अपोजिशनने जेव्हा एक प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला तर त्याला बोलू दिल गेल नाही. त्यामुळे प्रश्न असा पडतो की संसदीय लोकशाहीमध्ये एनडीए सरकार आता माईक बंद करणं हे नवीन हत्यार वापरताना दिसत आहे आणि म्हणून याचा निषेध करणे आवश्यक आहे.

सुमारे ३० ते ३५ लाख तरुण विद्यार्थी संपूर्ण देशातून नीट आणि नेट या परीक्षा देतात. प्रत्येक घरामधून जेव्हा तरुण एखादी परीक्षा देतो, त्या तरुणाभोवती त्या युवकाभोवती त्या विद्यार्थ्याभोवती त्या घरातले किमान पाच लोक आशा बाळगून असतात की माझा मुलगा यूपीएससी पास होईल, एमपीएससी पास होईल, तो नोकरशाहीमध्ये मोठ्या पदांवरती जाईल, आपल्या घरामध्ये सुख नांदू शकेल. हे भविष्य त्या व्यक्तीचं नव्हे त्या कुटुंबाचं असतं आणि म्हणून अशा वेळेस ३० ते ३५ लाख विद्यार्थी याचा अर्थ या देशातले दीड ते दोन कोटी लोक आज या नीट आणि नेट परीक्षेवरती म्हणजे पालक विद्यार्थी हे सगळे मिळून दीड ते दोन कोटी लोकांचे संपूर्ण लक्ष या परीक्षांकडे आहे आणि त्या परीक्षांमधून जर त्यांचं आयुष्य बरबाद होणारी गोष्ट होत असेल, गेल्या १०-१२ वर्षात जे होतंय ते रोखलं गेलं पाहिजे चर्चा व्हायला पाहिजे त्याच्यामध्ये सुधारणा व्हायला पाहिजे त्याच्यामध्ये निष्पक्ष पद्धतीने चांगल्या पद्धतीने त्या कॉम्पिटिटीव्ह एक्झाम पार पडल्या पाहिजेत त्यातून आपल्या तरुणांचं भवितव्य ठरणार आहे.

या देशांमध्ये गेली दहा वर्ष सातत्याने विशेष करून मध्यप्रदेश उत्तर प्रदेश बिहार ओरिसा आणि अगदी हरियाणा राजस्थान मध्यप्रदेश गुजरात आणि महाराष्ट्र कर्नाटक सुद्धा याला अपवाद नाही. या ठिकाणी ज्या स्पर्धा परीक्षा होतात. महाराष्ट्रामध्ये एमपीएससी, राष्ट्रीय पातळीवरती यूपीएससी आणि नेटसेट ही परीक्षा आहे. जे शिक्षक आहेत प्राध्यापक आहेत त्यांना ही परीक्षा द्यावी लागते, ती पूर्व अट आहे. त्यांच्या प्रमोशन साठी सुद्धा आणि त्यांचं तंत्रज्ञानाचं शिक्षण आणि संपूर्ण नवीन जी पद्धती आहे शिक्षण व्यवस्था त्याच्याम ध्ये नेट हे कंपलसरी आहे. मुद्दा असा आहे की या स्पर्धा परीक्षा ज्यातले पेपर्स लीक होतात. लीक होतात म्हणजे काय तर चक्क ज्या दिवशी परीक्षा असते त्या परीक्षेच्या आधी अशी परिस्थिती निर्माण होते की काही दलाल हे पेपर लीक करतात आणि ते पेपर लीक करत असताना त्या त्या ठिकाणचे राज्यकर्ते त्यांना मदत करतात त्या त्या ठिकाण मधले पोलिसांमध्ये लोक हे सुद्धा मदत करतात. मुख्यतः जी दलाल मंडळी असतात जी या विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळतात आणि ते लाखो रुपये उकळत असताना राजकीय पक्षांचे नेते आपले खिसे भरतात.

नोकरशाहीतले लोक आपले खिसे भरतात आणि हे त्या ज्या यंत्रणा आहेत म्हणजे पोलीस विशेष करून याच्या मध्ये सुद्धा भ्रष्टाचार आहे. त्या त्या राज्यांमध्ये परिणाम असा आहे की नीट आणि नेट ज्याच्यामध्ये विद्यार्थ्यांचं वर्षानुवर्ष नुकसान होते त्याची दखल कोणी घेत नाहीये आणि दखल न घेतल्यामुळे एकेका विद्यार्थ्याला किती वेळा त्याने नीटची परीक्षा द्यावी किती वेळा पैसे घालावेत किती वेळा त्याच्या आयुष्यातले अगदी तरुणाईतले दिवस रात्ररात्र अभ्यास करून जेव्हा परीक्षेची वेळ येते तेव्हा पेपर लीक झालेला असतो आणि लीक पेपर ज्यांच्या हातात मिळतो ती धनाड्यांची मुलं असतात, राजकीय नेत्यांची मुलं असतात, ते ती परीक्षापास होऊन पुढे जातात मग ते आयएस, आयपीएस, यूपीएससी मधून ब्युरोक्रसी मधल्या वरच्या पदांमध्ये यूपीएससी मधले लोक राष्ट्रीय पातळीवरती, एमपीएससी मधले लोक महाराष्ट्राच्या पातळीवरती निवडले जातात.

या देशामध्ये हुकुमशाही तानाशाही राबवणारे भारतीय जनता पक्षाने नवीन एनडीएचे सरकार म्हणून जे आलं त्यात मोदी आणि शहा आणि त्याचबरोबर आमचे सभापती ते अजूनही त्याच मगरूरीमध्ये आहेत. त्यामुळे संसद नीट चालावं याकरिता लोकांना रस्त्यावरती यावं लागेल. लोक जेवढे सतर्क राहतील तेवढंच या एनडीए वरती दडपण राहू शकेल. युवकांच्या भवितव्याशी खेळणार हे सरकार याला सर्व राज्यांमधून माघारी घालवणं हे आज या देशातल्या जनतेचं कर्तव्य बनलं पाहिजे सर्व विद्यार्थी सर्व पालक तरुण आणि तरुणी यांनी ही प्राप्त परिस्थिती नीटपणे समजावून घेऊन रस्त्यावरच्या लढाईत पण सहभाग केला पाहिजे. विद्यार्थी अभ्यास करतात पण त्यांच्या भवितव्यामध्ये अडथळे जर हे सत्ताधारी पक्ष करत असतील तर त्यांना पण सरळ करणं हे विद्यार्थ्यांच्या आणि पर्यायाने तमाम जनतेच्या हातात आहे आणि म्हणून नीट आणि नेट याच्यावरती नीटपणे चर्चा लोकसभेत आणि राज्यसभेत व्हायला पाहिजे हा लोकांच्या हक्कांचा प्रश्न आहे हा संविधानातल्या युवकांच्या हक्कांचा प्रश्न आहे आणि त्याचा अनादर जर या देशातले सत्ताधारी पक्ष करत असतील तर त्यांना घरी पोहोचवण्याकरता जन आंदोलनाशिवाय पर्याय नाही असं माझं प्रामाणिक मत आहे. त्यामुळे नीट वरती चर्चा, नेटसेट, वरती चर्चा भ्रष्टाचारी शिक्षण व्यवस्थेची चर्चा ही झालीच पाहिजे ही तमाम जनतेची मागणी आहे असं मला प्रामाणिकपणे सांगायचं आहे या आंदोलनांमध्ये सर्व सुशिक्षीतांनी उडी घेतली पाहिजे आणि युवकांचं भवितव्य सुरक्षित राखलं पाहिजे असं माझं प्रामाणिक मत आहे.

वाढते धर्मांतर : एक गंभीर समस्या !

एका खटल्यातील जामिनाच्या प्रकरणी निकाल देताना अलाहाबाद उच्च न्यायालयाने देशातील वाढत्या धर्मांतराबाबत केलेल्या वक्तव्यामुळे भारतातील धर्मांतराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ''उत्तरप्रदेशमध्ये निरपराध गरीब लोकांना दिशाभूल करून ख्रिस्ती बनवले जात आहे. असेच धर्मांतर होत राहिले, तर एक दिवस भारतातील बहुसंख्य लोकसंख्या अल्पसंख्य होईल.'' असे वक्तव्य न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांनी करताना धर्मांतर करणार्या धार्मिक मेळाव्यांवर तात्काळ बंदी घालण्याचा आदेशही दिला आहे. 'अशा घटना राज्यघटनेच्या विरोधात आहेत', असेही त्यांनी यावेळी नमूद केले आहे. कैलास नावाच्या एका ख्रिस्त्याने उत्तरप्रदेशातील एका हिंदु व्यक्तीचे धर्मांतर केले होते. या प्रकरणी त्याला अटक करण्यात आली आहे. त्याच्या जामिनावर न्यायालयात सुनावणी चालू आहे. 'कैलास याच्यावरील आरोप गंभीर आहेत. अशा स्थितीत त्याची जामिनावर सुटका होऊ शकत नाही', असे सांगत न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला.

आजतागायत हिंदुस्थानावर अनेक आक्रमणे झाली. अराबांपासून इंग्रजांपर्यंत लुटीच्या उद्देशाने भारतात आलेल्या आक्रमकांनी देशातील वैभव तर लुटलेच याशिवाय तलवारीच्या बळावर तर काही ठिकाणी विविध आमिषे दाखवून स्थानिक हिंदू जनतेचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर घडवून आणले. महम्मद कासीम, औरंगजेब, टिपू सुलतान, हैदराबादमधील निजाम यांनी हिंदूंचे तलवारीच्या बळावर धमांतर केले.

ज्यांनी धर्मांतरास नकार दिला त्यांच्या कत्तली करण्यात आल्या. काश्मीर, पंजाब, उत्तरप्रदेश आणि दिल्ली या उत्तरेकडील भागात या काळात मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले. या धमांतरितांची संख्या एव्हढी प्रचंड होती की पुढे पाकिस्तान, अफगाणिस्तान, कंबोडिया आणि ब्रह्मदेश यांसारखे मुस्लिमांचे स्वतंत्र देश हिंदुस्थानापासून वेगळे झाले. ख्रिस्ती धर्माच्या स्थापनेनंतर पहिल्याच शतकात (वर्ष ५२ मध्ये) सेंट थॉमस हा ख्रिस्ती धर्मोपदेशक हिंदुस्थानातील केरळ प्रांतात आला आणि त्याने तेथे ख्रिस्ती धर्माचा प्रसार चालू केला. १४९८ मध्ये वास्को द गामाच्या नेतृत्वाखाली पोर्तुगिजांनी हिंदुस्थानात पाय ठेवले आणि ख्रिस्त्यांच्या साम्राज्यवादी धर्ममताचा राजकीय प्रवास चालू झाला. वास्को द गामाच्या पाठोपाठ ख्रिस्ती धर्मप्रसार करणारे मिशनरी आले. त्यानंतर 'व्यापारी दृष्टीकोनातून राज्यविस्तार' या तत्त्वापेक्षा 'ख्रिस्ती धर्मप्रसार' हाच पोर्तुगिजांचा प्रमुख हेतू झाला. त्यातून बाटवाबाटवी चालू झाली. ख्रिस्ती मिशनरी रात्रीच्या वेळी घरामागील विहिरीत पाव टाकत आणि सकाळी लोक ते पाणी प्यायले की, 'तुम्ही ख्रिस्ती झालात', असे त्यांना सांगत. घाबरलेले हिंदू 'आपण फसलो', असे ओळखून ख्रिस्ती धर्माप्रमाणे वागू लागत.

सेंट झेवियर हा स्वतःची धर्मांतराची रीत सांगतांना लिहितो, 'एका मासात मी त्रावणकोर राज्यात १० हजारांहून अधिक पुरुष, स्त्रिया आणि मुले यांना बाटवून त्यांची नावे पोर्तुगीज केली. बाप्तिस्मा दिल्यावर या नवख्रिस्त्यांना मी त्यांचे देव आणि देवघर नष्ट करण्याचा आदेश दिला. अशा रीतीने मी एका गावाहून दुसर्या गावी जात लोकांना ख्रिस्ती बनवले.' १७५७ मध्ये 'ईस्ट इंडिया कंपनी'चे राज्य बंगालमध्ये स्थापन झाले. त्यानंतर १८ व्या शतकाच्या शेवटी चार्ल्स ग्रँट या इंग्रजाने 'हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्मप्रचार कसा करता येईल', याविषयी प्रबंध बनवून तो ब्रिटीश संसदेत विल्यम विल्बरफोर्स, अन्य काही खासदार आणि कॅन्टरबरीचे आर्चबिशप यांच्याकडे पाठवला. चार्ल्स ग्रँटच्या या प्रस्तावावर ब्रिटिश संसदेत सतत आठ दिवस चर्चा झाल्यानंतर ख्रिस्ती मिशनर्यांना धर्मप्रसाराची अनुमती मिळाली. १८५७ च्ह्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ख्रिस्ती मिशनरी आणि ब्रिटीश साम्राज्यशाही यांचे नाते अधिक दृढ झाले. वर्ष १८५९ मध्ये 'भारतात शक्य तितक्या लवकर ख्रिस्ती धर्माचा जितका प्रचार आपण करू, तितके ते आपल्या साम्राज्यासाठी हिताचे आहे', असे लॉर्ड पामरस्टनने कॅन्टरबरीच्या आर्चबिशपला सांगितले होते. इंग्रजांनी हिंदुस्थानात पाय रोवल्यानंतर 'हिंदुस्थानी लोकांना कोणत्या भाषेत शिक्षण द्यावे', यासंबंधी विचार चालू असतांना ब्रिटीश शिक्षणतज्ञ लॉर्ड मेकॉले याने कट्टर ख्रिस्ती धर्मवादी आणि धर्मप्रसारक असलेल्या त्याच्या वडिलांना पत्रांतून कळवले, 'इंग्रजी भाषेत शिक्षण घेतलेला हिंदू कधीही त्याच्या धर्माशी बांधील रहात नाही. असे अहिंदू पुढे 'हिंदु धर्म कसा चुकीचा आहे आणि ख्रिस्ती धर्म कसा श्रेष्ठ आहे', याचा ठामपणे प्रसार करतात आणि त्यांच्यापैकी काही जण ख्रिस्ती धर्म स्वीकारतात. भारताला लुटण्याच्या आणि भारतात ख्रिस्ती धर्मप्रसार करण्याच्या उद्देशाने आलेले इंग्रज आजही काही जणांना सुधारणावादी वाटतात. आपल्या मुलाने फाडफाड इंग्रजी बोलावे यासाठी आज अनेक पालक आपल्या मुलांना मिशनरी शाळांमध्ये घालतात हे भारताचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

हिंदुस्थानातील वाढत्या धर्मांतरावर आजच उपाय काढला नाही तर भविष्यात देशातील अनेक भागांत हिंदू अल्पसंख्य झाल्याचे पाहायला मिळेल हे अलाहाबाद उच्च न्यायालयाने वर्तवलेले भाकीत तंतोतंत सत्य असून देशातील काही भागांत आज हिंदू अल्पसंख्य झाले आहेत. देशात धर्मांतरबंदी कायदा लागू करण्यासाठी अनेक हिंदुत्वनिष्ठ आणि राष्ट्रेप्रेमी संघटना मागील अनेक वर्षांपासून सनदशीर मार्गाने प्रयत्न करत आहेत, मात्र सरकारच धर्मांतरबंदी विषयी उदासीन असल्यामुळे वाढत्या धर्मांतरावर आळा बसलेला नाही. कोरोनासारख्या आपत्तीकाळात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मदतीच्या नावाखाली भारतातील तब्बल १ लक्ष हतबल लोकांचे धर्मांतर केल्याचे वृत्त मध्यंतरी प्रसिद्ध झाले होते. आदिवासी पाड्यांत, दारिद्र्य रेषेखालील वस्त्यांमध्ये जाऊन मिशनरी थोड्या थोडक्या मदतीच्या मोबदल्यात गरिबांचे धर्मांतर करतात हे ऐकले होते; मात्र कोरोनासारख्या महामारीत जिथे सरकारने कडक लॉकडाऊन जाहीर केलेला असतानाही सरकारने घालून दिलेले नियम पायदळी तुडवून ही मंडळी धर्मांतराचा एककलमी कार्यक्रम राबवत होती. साऱ्या जगाला समतेचा आणि निस्वार्थ सेवेचा संदेश देणाऱ्या भगवान येशूच्या आत्म्याला त्यांच्या अनुयायांकडून गोर गरिबांच्या असहायतेचा घेतला जात असलेला गैरफायदा पाहून किती वेदना होत असतील याची कल्पनाही करवत नाही. एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने गरजवंताचा धर्म बदलायचा हा कुठला धर्मप्रसार म्हणायचा ?

येशूच साऱ्या जगाचा तारणहार आहे, अशा आशयाची पत्रके आजही अनेक भागांत घराघरांत वाटली जातात, भिंतीवर अशा स्वरूपाचे संदेश काही ठिकाणी पाहायला मिळतात. हल्ली तर इंटरनेटवरसुद्धा जाहिरातींच्या रकान्यात अशा प्रकारची वाक्ये पाहायला मिळतात. धर्मांतरासाठी वातावरणनिर्मिती करण्याची ही पद्धत असून व्यवहारात पिचलेली, शारीरिक किंवा मानसिक समस्यांनी ग्रासलेली व्यक्ती अशा प्रकारच्या संदेशांना बळी पडते. ख्रिस्ती धर्मांतरित झालेली काही स्थानिक मंडळी गावागावांत जाऊन गावकऱ्यांशी त्यांच्या भाषेत संवाद साधतात, त्यांना छोटी छोटी पुस्तके वाचायला देतात ज्यामध्ये येशूला प्रार्थना केल्यावर, त्याची उपासना केल्यावर कशी दैन्य दुःख दूर झाली याचा महिमा वर्णन केलेला असतो. ग्रामीण भागांत लघुपट, स्लाईड शो आदींच्या माध्यमातून ग्रामस्थांना ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर अनेकांची कशी भरभराट झाली हे बिंबवण्याचा प्रयत्न केला जातो. उच्चभ्रू वस्त्यांमध्ये व्यसनांपासून आणि अमली पदार्थांपासून मुक्ती देण्याचे वर्ग भरवले जाऊन त्या माध्यमातून ख्रिस्ती धमकिडे लोकांना आकर्षित केले जाते. आदिवासी आणि गरीब वस्त्यांमध्ये पैसे, शिक्षण, धान्य, कपडे, मुलांना खेळणी, खाऊ, वैद्यकीय उपचार आदी प्रलोभने दाखवून धर्मांतर केले जाते. नैसर्गिक आपत्ती तर मिशनऱ्यांसाठी नामी संधी असते. अशा ठिकाणी मदतीच्या नावाखाली धर्मांतराचा अजेंडा राबवला जातो. वृद्धाश्रम, कुष्ठरोग निर्मूलन संस्था, रुग्णसेवा, परित्यक्तागृहे, शाळा इत्यादी सेवाकार्यांच्या आडून हिंदूंच्या धर्मांतराचे काम मिशनरी करत आहेत. मिशनऱ्यांच्या मार्फत भरवले जाणारे मोठमोठे महोत्सव हे धर्मांतराच्या हेतूनेच भरवले जातात. यावेळी अगोदरच ठरवलेल्या काही व्यक्तींना व्यासपीठावर बोलावले जाते. या व्यक्ती भयंकर शारिरिक व्याधीनी ग्रस्त असल्याचे भासवले जाते. व्यासपीठावर कर्यक्रम नियंत्रित करणारा पाद्री मोठनोठ्याने किंचालत कोणतातरी मंत्र पुतपुटतो आणि व्याधीग्रस्त माणसाला धावायला, नाचायला प्रवृत्त करतो. काही मिनिटांपूर्वी कुबड्यांच्या किंवा अन्य कोणाच्या सहाय्याने स्टेजवर पोहोचणारा माणूस पाद्रीच्या मंत्र पुटपुटण्याने आणि किंचालण्याने वेड्यासारखा सैरावैरा धावू लागतो. हा सारा चमत्कार असल्याचे आयोजकांकडून भासवले आणि बिंबवले जाते आणि हा चमत्कार पाहण्यासाठी जमलेले भोळेभाबडे हिंदुही यावर विश्वास ठेवतात. आपण ख्रिस्ती पंथ स्वीकारला कि आपल्याही साऱ्या व्याधी दूर होऊन आपल्याही जीवनात चमत्कार घडेल या आशेने धर्मपरिवर्तन करतात.

महाराष्ट्रसारख्या पुरोगामी राज्यात जिथे अशा प्रकारचे चमत्कार करण्याचा दावा करणे कायदेशीर गुन्हा आहे अशा राज्यातही या मिशनऱ्यांचे महोत्सव हजारोच्या उपस्थितित साजरे होतात.हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल लावणाऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीला हें दिसत नाही का? आजपर्यंतच्या राज्याकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे लडाख, मिझोराम, लक्षद्वीप, काश्मीर, नागालँड, मेघालय, अरुणाचल प्रदेश, पंजाब आणि काश्मीर राज्यांत हिंदु अल्पसंख्य झाले आहेत. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत देशातील हिंदूंचे धर्मांतरण झाल्याचे वर्षनिहाय आकडे पाहिल्यास हे असेच चालत राहिले तर काही वर्षांनी हिंदुस्थानात हिंदूच नामशेष होतील की काय असे भय वाटू लागले आहे. इतिहासात मुघलांनी मंदिरे पाडून मशिदी उभारल्या आता बळाने नाही मात्र छळाने चर्च उभे रहात आहेत. ही राष्टीय समस्या आहे आणि तितकीच गंभीरही आहे. धर्मांतरण बंदी कायद्याची गरज यानिमित्ताने पुन्हा एकदा निर्माण झाली आहे हेच खरे !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्कक्रमांक: ९६६४५५९७८०

जनसंवाद

तीन ऐवजी दोन हजार व्हावी !

तीन हजार लोकसंख्या असलेल्या गावांना नवीन ग्रंथालय मंजुरी देण्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी केली ही बाब समाधान देणारी आहे, परंतु कोकणासारख्या ठिकाणी तीन हजार लोकवस्ती असलेली गावे अभावनेच आढळतात त्यामुळे अधिकाधिक गांव या योजनेपासून वंचित राहू शकतात हे नाकारता येत नाही ? आणि म्हणूनच किमान दोन हजार लोकवस्ती असलेल्या गावांना नवीन ग्रंथालयाची मंजुरी दिल्यास अनेक गावांना त्याचा लाभ घेता येईल.

विश्वनाथ पंडित, ठाणे

गोवा राज्यात वैश्विक हिंदू राष्ट्र संमेलन पार

सामाजिक संकेतस्थळावर काही दिवसांपूर्वी बातमी वाचली की गोवा राज्यात अनेक हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्र येऊन महोत्सव करणार आहेत. गेल्या आठवड्यात अनेक हिंदू विचारसरणी जपलेल्या वक्त्यांची भाषणे युट्युब वर बघायला मिळाली. यातून एक महत्वाचा भाग समजला, की भारतात वेगवेगळ्या संघटना आपापल्या परीने हिंदू धर्म संवर्धन आणि संस्कृती जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. या महोत्सवात प्रत्येक राज्य आणि क्षेत्र यांतील हिंदू शक्तींना हिंदू राष्टासाठी संघटित केले गेले. अनेक हिंदू संघटना, धर्मनिष्ठ अधिवक्ते, विचारवंत, संत, व्यावसायिक, प्रसारमाध्यमे आदींची हिंदू इकॉसिस्टम उभी केली गेली आहे. असे सलग १२ वर्षे करीत आहे आणि पुढेही हे संघटन वाढवण्याच्या दृष्टीने ते कटिबद्ध आहेत असे त्यांच्या विविध विषयांवरील संवाद शृंखलेतून स्पष्ट झाले आहे.

अयोध्येत राममंदिर स्थापना झाल्यापासून भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यात येईल, अशी बातमी ऐकायला मिळत होती;पण ते एवढे सहज साध्य होऊ शकत नाही. कारण आपल्यासमोर विविध आव्हाने आ वासून उभी आहेत. जिहादी आतंकवाद, अर्बन नक्षलवाद, वाढत्या आतंकवादी कारवाया, अराजकतेकडे जाणारे सत्तापिपासू राजकारण, हिंदूविरोधी पक्षांची लांगुलचालनाची आणि दडपशाहीची भूमिका, हिंदू संस्कृतीची गळचेपी, हिंदू संत आणि परंपरा यावर केलेले आक्रमण, गोहत्याबंदी असूनही त्यांच्या हत्येचे वाढलेले प्रमाण या आणि अश्या अनेक समस्या आज अनेक हिंदुत्ववादी आपल्या परीने निवारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या सर्वांना एकत्र गुंफून एकत्रीतपणे लढा दिल्यास आपण यातून लवकरात लवकर मार्ग काढू शकतो, हेच या महोत्सवाचे फलित असावे, अशी आशा आहे.

श्री आल्हाद माळगांवकर
पनवेल

वारीमार्गात पितांबरी चा सेवाभावी उपक्रम !

आठशेहुन अधिक वर्षांची परंपरा लाभलेली पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. ङ्खाळ्यामंदी तुळसीमाळ, मस्तकी चंदनाचा टिळा श्र मुखी विठूचे नाम, मनी माऊलीच्या भेटीचा लळा श्रश्रङ्ख असा हा वारकरी ज्याला आषाढी एकादशी जवळ आली कि भगवंत भेटीची आस लागते. मग पाय आपसूकच पंढरीच्या दिशेने वळू लागतात. खांद्यावर भगवी पताका माळून विठूनामाचा गजर करत तो वारीला निघतो. ऊन पावसाची तमा न बाळगता, तहानभूक विसरून माऊलीच्या भेटीसाठी निघालेला हा विठूभक्त जेव्हा दमतो, थकतो तेव्हा क्षणभर विश्रांतीसाठी थांबतो. अशावेळी त्याला चालण्याचे पुन्हा बळ मिळावे, त्याच्यात उत्साह यावा यासाठी पितांबरी आस्थापनाच्या वतीने दरवर्षी वारीमार्गावर वारकऱ्यांच्या हाता-पायांना तेल लावून मसाज केले जाते. पितांबरीचे स्वयंसेवक दमलेल्या वारकऱ्यांची मायेने विचारपूस करतात. त्यांच्या हाता-पायांना, पाठीला पितांबरीचेच उत्पादन असलेले क्युअर ऑन वेदनाशामक तेल लावून मसाज करतात. हाडांच्या दुखण्यासाठी प्रभावी असलेल्या या तेलाच्या मालिश मुळे वारकऱ्यांनाही वेदनेपासून आराम मिळतो. शेकडो कोलो मीटरचा पायी प्रवास करून वारकरी शरीराने थकला असला, तरी विठूमाऊलीच्या दर्शनाची आस मनी असल्याने त्याचे मन थकत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा तेवढ्याच उत्साहाने तो पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतो. दरवर्षी वारीकाळात हजारो वारकऱ्यांचे हातापायांचे दुखणे पितांबरी दूर करत असते. वयोवृद्ध, तपोवृद्ध वारकऱ्यांच्या सेवेच्या मोबदल्यातत्यांच्याआशीर्वादाचा ठेवा जमा करत पितांबरीचा हा सेवाभावी उपक्रम कोरोना महामारीचा काळ वगळता गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरु आहे. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कंपनीचे मालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा दरवर्षी हजारो वारकरी लाभ घेत असतात. यंदाही त्यांच्या स्वयंसेवकांचा चमू पंढरीच्या दिशेने निघाल्याचे वृत्त वाचनात आले. राज्यात अनेक औषधी कंपन्या आहेत ज्या राज्यात व्यवसाय करून आज मोठ्या झाल्या आहेत. त्यांनीही पितांबरीच्या या उपक्रमातून बोध घेऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घ्यावा !

जगन घाणेकर, घाटकोपर

भारतात ४०,००० फोक्सवॅगन वाहनांची विक्री करणारी देशातील पहिली मल्टी- स्टेट डीलर

हैद्राबाद

पीपीएस मोटर्स - मोठ्या वाहन समूहाचा भाग - देशातील सर्वात मोठ्या वाहन समूहांपैकी एक असलेल्या कंपनीने ४०,००० फोक्सवॅगन वाहनांच्या विक्रीचा टप्पा साध्य केल्याचे जाहीर केले असून, हा विक्रम करणारी ती भारतातील पहिलीच मल्टी- स्टेट डीलर ठरली आहे. पीपीएस मोटर्सकडे फोक्सवॅगनचे सर्वाधिक टचपॉइंट्स आहेत. तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल आणि आसाम या पाच राज्यांत मिळून एकूण ३३ टचपॉइंट्स कार्यरत आहेत.

कोविड महामारीनंतर वाहन उद्योगात मंदी येऊनही पीपीएस मोटर्सने ३३ टच पॉइंट्सपर्यंत विस्तार करत, कंपनी फोक्सवॅगनसाठी सर्वात मोठे नेटवर्क भागीदार बनली आहे. सध्या भारतात प्रत्येक दहावे फोक्सवॅगन वाहन पीपीएस मोटर्सच्या माध्यमातून विकले जाते. यावरून कंपनीचे बाजारपेठेतील आघाडीचे स्थान आणि ग्राहक समाधानाप्रति असामान्य बांधिलकी दिसून येते. पीपीएस मोटर्स - फोक्सवॅगन टचपॉइंट्सना गुगलवर असलेले ४.८ रेटिंग दर्जेदार सेवा आणि ग्राहकांना मिळणारे समाधान दर्शविणारे आहे.

पीपीएस मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव संघवी याप्रसंगी म्हणाले, 'गेल्या दीड दशकांच्या या प्रवासात फोक्सवॅगनसह भागीदारी केल्याचा आम्हाला आनंद होत असून, हा काळ आमच्यासाठी फलदायी होता. ग्राहकांनी दाखविलेला विश्वास आणि पाठिंब्यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत. त्यांच्याप्रमुळे पीपीएस मोटर्सला ४०,००० कार विक्रीचा टप्पा ओलांडणे शक्य झाले. फोक्सवॅगनची सर्वात मोठी भागीदार असल्याचा आणि भारतातील प्रत्येक दहावी फोक्सवॅग पीपीएस मोटर्सतर्फे विकली जात असल्याचा आम्हाला अभिमान वाटतो.'

याप्रसंगी फोक्सवॅगन पॅसेंजर कार्स इंडियाचे ब्रँड संचालक श्री. आशिष गुप्ता म्हणाले, 'या असामान्य कामगिरीसाठी आम्ही पीपीएस मोटर्सचे अभिनंदन करतो. ते बऱ्याच काळापासून आमचे भागीदार आहेत आणि प्रमुख बाजारपेठांत फोक्सवॅगनच्या विकासाला चालना देत आहेत. आम्हाला विश्वास वाटतो की, पीपीएस मोटर्स आमच्या विस्तारित फोक्सवॅगन कुटुंबाला दर्जेदार ग्राहकसेवा पुरवत सातत्याने नवे मापदंड प्रस्थापित करेल.' ४०,००० वी फोक्सवॅगन कार, रिफ्लेक्स सिल्व्हर कलर्ड व्हर्च्युस कम्फर्टलाइन हैद्राबादमधील कुकटपल्ली सिटी शोरूममध्ये आयोजित करण्यात आलेल्या खास कार्यक्रमात प्रदान करण्यात आली.

गेल्या पंधरा वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या भागीदारीत पीपीएस मोटर्सने १५ पुरस्कार व मानसन्मान मिळविले आहेत. पीपीएस मोटर्स संपूर्ण भारतातील विक्रीमध्ये पहिल्या क्रमांकावर असून फोक्सवॅगनने २०१९, २०२०, २०२१, २०२३ मध्ये सर्वोच्च विक्री योगदान पुरस्कार, फोकस सेगमेंट २०२३ मधील सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार, बेस्ट एक्सचेंज सेल्स पेनट्रेशनचा पुरस्कार सलग तीन वर्ष (२०२१, २०२२, २०२३), सर्वोच्च विक्री पुरस्कार तैगुन आणि तिगुन, तसेच पीपीएस मोटर्सकडून इतर सन्मानांसह सादर केला आहे.

दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग) : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अपार्टमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

आजगाव परिसरावर पुन्हा मायनिंगचे संकटाची थाप!

पंचक्रोशीतील ९ ग्रामपंचायतींना पत्र देऊन खनिज उत्खननाच्या चाचणीसाठी परवानगी मागितली आहे. मात्र सर्वच गावांकडून विरोध केला जात आहे. खनिज उत्खनन कोकणासाठी शाप आहे. यापुढे आजूबाजूला झालेले खनिज उत्खनन प्रकल्प हे विनाशकारी आहेत हे सिद्ध झाल आहे, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. तळवणे, रेडी, कळणे या गावात झालेले हे प्रकल्प आणि त्यामुळे त्याठिकाणी होणारे आरोग्याचे प्रश्न, पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे या नऊ गावांचा विरोध आहे. प्रत्येक गावात ग्रामसभा घेऊन विरोध केला जात आहे. या प्रकल्पामुळे पर्यावणाचा ऱ्हास, नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट झाली. उभे डोंगर कापून कोकण कुरुप केलं जातं आहे, असंही गावकऱ्यांचं म्हणणं आहे.

या नऊ गावात खनिज उत्खनन प्रकल्प आल्यास शेतकरी रसातळाला जाईल. या ठिकाणी नैसर्गिकरित्या आलेल्या सुरंगी झाड नष्ट होतील. त्यामुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प होऊन शेतकऱ्यांचे हाल होतील. असे प्रकल्प गावात आल्यानंतर राजकारण केलं जातं. त्यामुळे ग्रामस्थांनी एकजुटीने लढून या प्रकल्पांना विरोध केला पाहिजे. हिरवेगार डोंगर हे आपल्या कोकणाची साधनसंपत्ती आहे. हेच डोंगर कापले गेले तर भविष्यात पावसावरही परिणाम होईल. ग्लोबल वार्मिंगचा परिणाम डोंगर कापल्याने होणार आहे. त्यामुळे हा लढा कोर्टापर्यंत लढण्याची गावकऱ्यांची तयारी सुरु झाली आहे.

दाभोली येथे विविध जातींच्या फणस झाडांची लागवड

अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्रास्ताविक अण्णा जोशी, स्वागत प्रभाकर जोशी यांनी तर आभार कृषी अधिकारी देसाई यांनी मानले.

मडुऱ्यासाठी स्वतंत्र तलाठी द्यावा – उपसरपंच बाळू गावडे

त्या दिवसाची वाट पहावी लागते. त्यामुळे मडुऱ्यासाठी स्वतंत्र तलाठी उपलब्ध करून घ्यावा अशी मागणी मडुरा उपसरपंच बाळू गावडे यांनी सावंतवाडी तहसीलदार यांच्याकडे केली आहे. दरम्यान, सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका दाखवल्याचे उपसरपंच बाळू गावडे यांनी सांगितले. मडुरा येथे बांधण्यात आलेल्या नविन तलाठी कार्यालयाबाबत अनेक त्रुटी असून प्रत्यक्षात पाहणी केल्याशिवाय त्यास परवानगी देऊ नये असे बाळू गावडे यांनी तहसीलदार यांना सांगितले. तसेच पुलाचे बांधकाम करताना गावातील तीन वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येणारी पाईपलाईनचे नुकसान केले व अद्यापपर्यंत ती दुरुस्ती केली नसल्याची बाळू गावडे यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिली

आडवली येथील चिरेखाणीचे साहित्य चोरीला

खबर मिळताच आचरा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल व्हटकर, सहा.पोलीस उपनिरीक्षक महेश देसाई, पोलीस हवालदार मिलिंद परब,बाळू कांबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला. अधिक तपास सपोनी अनिल व्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दानोली ते आंबोली घाट रस्ताचे डांबरीकरणाचे पितळ पहिल्याच पावसात पडले उघडे

गोव्यामध्ये जात असतात. अशा महत्त्वाच्या मार्गाचे काम हे गुणवत्तापूर्वक होणे गरजेचे आहे मात्र ठेकेदारांवर अधिकाऱ्यांचा अंकुश नसल्यानेच ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करत आहे. जनते प्रति कळवळा असणारे सर्व पक्षिय राजकीय पदाधिकारी सुद्धा काम सूरु असताना दुर्लक्ष करत असल्याने कामाचा दर्जा पाहिला जात नाही. आणि त्यामुळे शासकीय निधीची ही लूटमार सुरू आहे. या उखडलेल्या खडी वरून घसरून एखाद्या दुचाकी स्वराचा अपघात झाल्यास किंवा जीवितहानी झाल्यास याला जबाबदार कोण? यामध्ये साम ान्य जनतेने न्याय कोणाकडे मागायचा?सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री यांच्या घरापासून केवळ पाच-सहा किलो मीटरच्या अंतरावर रस्त्याची जर अशी दयनीय परिस्थिती असेल तर हे अधिकारी किती निर्ढावलेले असतील याची कल्पना न केलेलीच बरी.

कुडाळ रेल्वेस्थानकावर अनोळखी व्यक्तीचा सापडला मृतदेह

बोलविण्यात आली. त्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून सदर व्यक्ती मृत झाल्याचे सांगितले. याबाबत कुडाळ पोलीस ठाण्यात खबर देण्यात आली. हवालदार अनिल पाटील व स्वप्नील चव्हाण यांनी घटनास्थळी जात पंचनामा केला. मृतदेहावर पांढऱ्या रंगाचा फुल शर्ट ,निळ्या रंगाची फुलं ट्रकपँन्ट आहे. सोबत तपकिरी रंगाची बँग, लाल रंगाची बेड शीट तसेच आयटेल कंपनीचा मोबाईल मिळाला आहे. सायंकाळी उशिरापर्यंत त्या मृतदेहाची ओळख पटली नव्हती. कुडाळ पोलीस तपास करीत आहेत.

सोनुर्ली गावासाठी उभारण्यात आलेला बीएसएनएलचा टॉवर असून नसल्यासारखा

झाले आहे. त्यामुळेच हा टॉवर एक तर व्यवस्थित कार्यान्वित करा अन्यथा तो कायमचा बंद करा असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावामध्ये खाजगी कंपनीचा ही दुसरा टॉवर आहे परंतु बीएसएनएल टॉवर असल्याने ग्रामस्थ मोबाईल रिचार्ज करतात परंतु टॉवरच बंद असल्याने मोबाईलचे रिचार्ज फुकट जाते त्यामुळे ग्रामस्थातून याबाबत प्रचंड नाराजी आहे तरी याबाबत बीएसएनएल अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन सदरचा कार्यान्वित करावा अशी मागणी होत आहे.

गोव्यात वॉटर राफ्टिंग थरार; सप्टेंबरपर्यंत सुरु राहणार उपक्रम

तिथे व्हाईट वॉटर राफ्टिंगला सुरुवातही झाली आहे. राफ्टिंगच्या पहिल्याच दिवशी पाच जणांनी व्हाईट वॉटर राफ्टिंगमध्ये भाग घेऊन थरार अनुभवला. आता राज्यात पाऊस असेपर्यंत म्हणजे साधारण सप्टेंबरपर्यंत जीटीडीसीचे (गोवा टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) पाठबळ असलेला हा उपक्रम चालू राहील. जीटीडीसीच्या नियंत्रणाखाली हा उपक्रम खाजगी कंपनीमार्फत चालवला जातो. राफ्टिंगच्या एका फेरीसाठी प्रति व्यक्ती १८०० रुपये आकारले जातात. सुरक्षेच्या कारणास्तव १२० किलोपेक्षा जास्त वजनाच्या व्यक्तीला राफ्टिंगमध्ये परवानगी नाही. राफ्टिंग दरम्यान दारु पिणे, मौल्यवान वस्तू बाळगणे इत्यादीला प्रतिबंध असतो. राफ्टिंग ट्रिप दिवसातून दोनदा आयोजित केल्या जातात. साहसप्रेमी लोक दूरवरुन येऊन या उपक्रमाचा आनंद घेतात. आठवड्याच्या अखेरीस इथे खूप गर्दी असते आणि राफ्टींगमध्ये जागा मिळवण्यासाठी व्यक्तीला जीटीडीसीच्या वेबसाईटवरुन जागा आगाऊ आरक्षित कराव्या लागतात.

मंत्र्याच्या घराशेजारच्या शाळेची इमारत कोसळून विद्यार्थांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत हे महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव

सावंतवाडी । प्रतिनिधी

सावंतवाडी तालुका स्कूल (शाळा) म्हणून नोंद असलेली आणि ज्यामध्ये खुद्द शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी शिक्षण घेतलं अशी मंत्र्याच्या घराशेजारच्या शाळेची इमारत कोसळून विद्यार्थांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत हे महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव आहे अशी टीका माजी खासदार विनायक राऊत यांनी आज येथे केली.

तर विद्यार्थ्यांचा संच मान्यतेचा प्रश्न विशेष शिक्षकांचा प्रश्न पटसंख्येवर डोंगरी भागाला मिळालेली सवलत ही पूर्णपणे काढून टाकण्याचे पाप मंत्री केसरकर यांनी केले असून महाराष्ट्राच्या इतिहासातील हे पहिलेच शिक्षण मंत्री असतील की ज्यांना शिक्षण खात्याचा अर्थ समजला नाही अशी टीकाही श्री राऊत यांनी केली.

श्री राऊत यांनी आज सावंतवाडी तालुक्याचा दौरा केला यावेळी त्यांनी शहरातील तालुका शाळेला भेट देऊन कोसळलेल्या भागाची पाहणी केली त्यांच्यासोबत यावेळी उबाठा शिवसेना संपर्कप्रमुख अरूण दुधवडकर, जिल्हाप्रमुख संजय पडते, उपजिल्हा प्रमुख बाबुराव धुरी, तालुकाप्रमुख रुपेश राऊळ, बाळा गावडे, मायकल डिसोजा, जान्हवी सावंत, शब्बीर मणियार, चंद्रकांत कासार, शैलैश गवंडळकर, अजित सांगेलकर, कौस्तुभ गावडे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

श्री राऊत म्हणाले, शिक्षण खात्याची लापरवाही महाराष्ट्राला शोभनय नाही सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता तब्बल २२ शाळा

आजही जीर्ण झाल्या असून धोकादायक स्थितीत आहेत, अशा परिस्थितीतही त्या शाळेम ध्ये विद्यार्थी बसत आहेत एक प्रकारे विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्याचे काम शिक्षण मंत्री किंबहुना शिक्षण खाते करत आहे ज्या शाळेमध्ये खुद्द शिक्षण मंत्री दीपक केसरकर शिकले सावंतवाडी तालुक्याची तालुका शाळा म्हणून ज्याची नोंद आहे ती शिक्षण मंत्र्याच्या घराच्या बाजूची शाळा कोसळून त्याम ध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल. राऊत म्हणाले, मुंबईसारख्या शहरांमध्ये दोन पार्ट मध्ये शाळा भरते अशा ठिकाणीही सकाळी नऊ वाजता शाळा भरण्याची तकदीर शिक्षण खात्याने लावले आहे या ठिकाणी एकतर शिक्षण विभाग शाळा चालवण्यासाठी जागा देत नाही आणि खाजगी जागेमध्ये सुरू असलेल्या संस्थांवर दबाव आणला जातो हे चुकीचे आहे एकीकडे अशा शाळांवर दबाव आणायचा आणि दुसरीकडे मालकीच्या असलेल्या शाळेच्या इमारतीकडे दुर्लक्ष करायचे असे काम शिक्षण खाते करत आहे.

श्री राऊत पुढे म्हणाले, संच मान्यता निकषावर माजी आमदार राजन तेली यांनी मुख्यमंत्र्यांचे वेदलेले लक्ष बरोबर आहे मुळात डोंगरी भागाला मिळालेले सूट काढून टाकण्यात आल्याने या ठिकाणी विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. पटसंख्येच्या बाबतीत डोंगरी भागाला मिळालेली सवलत यातून रद्द होणार आहे त्यामुळे शिक्षकांचा प्रश्न पुढे येणार आहे मुख्याध्यापक पदही जाणार आहे एकूणच शिक्षण मंत्री म्हणून मोठेपण या जिल्ह्यासाठी केसरकर यांनी केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील केसरकर हे पहिलेच असे शिक्षण मंत्री असतील की त्यांना शिक्षण खात्याचा अर्थ समजला नाही.

कृषीदूतांकडून रक्षक सापळ्यांबाबत मार्गदर्शन

वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर

ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम २०२४ अंतर्गत वेतोरे-पालकरवाडी येथे आलेल्या कृषीदूतांनी तेथील शेतकऱ्यांना रक्षक सापळ्याबाबत प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले.

मुळदे येथील उद्यानविद्या महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या कृषीदूतांचे वेतोरे-पालकरवाडी येथे आगमन झाले असून नुकतेच विविध प्रकारची किटकनाशके व सापळे तसेच त्यांचा वापर आणि फायदे याबाबत त्यांनी तेथील शेतक-यांना मार्गदर्शन केले. यावेळी पालकरवाडी सरपंच यांच्यासह स्वीकार जाधप, सतिश नागर, ग्यानसिग मीना, अमरदीप वेलीप, शिवमणी भुशीगंपला, अमेय तेंडुलकर, साहिल यादव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

पालकरवाडी गावामध्ये मुख्यतः फळमाशीचा प्रचंड प्रादुर्भाव होत असून यावर उपाययोजना सुचविल्यामुळे सरपंच यांनी कृषीदूतांचे कौतुक केले.

सेवांगणच्या शिष्यवृत्ती वर्गातील आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

मालवण । वार्ताहर

शिष्यवृत्ती परीक्षा २०२४ च्या गुणवत्ता यादीमध्ये मालवण तालुक्यातील इयत्ता ५ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत शहर विभागातील ११ विद्यार्थी आणि ग्रामीण विभागातील ४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत. यामध्ये बॅ. नाथ पै सेवांगणच्या शिष्यवृत्ती मार्गदर्शन वर्गामधील मालवण विभागातून ६ तर कट्टा शाखेतून २ अशा आठ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

शहर विभागातील : कु. लेईशा पराडकर, २४६ गुण (तालुक्यात पहिली व जिल्हयात आठवी), कु. सोहम गवाणकर, २३४ गुण (तालुक्यात दुसरा जिल्ह्यात १५ वा), कु. स्वरीत कोल्हे, २१६ गुण (तालुक्यात ३रा व जिल्हयात २३ वा), कु. स्वरा बांदेकर, १९४ गुण (तालुक्यात ८ वी व जिल्ह्यात ५३ वी) कु. मंतसा ख़ान, १९४ गुण (तालुक्यात ९ वी जिल्ह्यात ५४ वी), कु. मीरा वराडकर, १८८ गुण (तालुक्यात ११ वी व जिल्हयात ६० वी). ग्रामीण विभागातील कु. काव्या अभिमन्यू मेस्त्री, (२२४ गुण व तालुक्यात पहिली) आणि कु. मनस्वी शैलेश परब, (१९६ गुण व तालुक्यात दुसरी.)

सेवांगण मालवणच्या शिष्यवृत्ती वर्गाचे हे दुसरे वर्ष असून २ वर्षात १६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. सेवांगण कट्टा शाखेचे हे २४ वे वर्ष असून या २४ वर्षात १५६ विद्यार्थी गुणवत्ता धारक ठरले आहेत. जुलै महिन्यात शुभारंभ होवून हा वर्ग जानेवारी पर्यंत दर शनिवारी व रविवारी सुरू असतो. विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शना बरोबरच सराव परीक्षा घेतल्या जातात. या विद्यार्थ्यांना मालवण येथे मनाली वेंगुर्लेकर व कट्टा येथे मनोज काळसेकर या प्रम ुख मार्गदर्शकांसह इतरही काही शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व गुणवंतांचे सेवांगणचे अध्यक्ष ॲड. देवदत्त परुळेकर, कार्याध्यक्ष किशोर शिरोडकर, कार्यवाह लक्ष्मीकांत खोबरेकर, कोषाध्यक्ष शैलेश खांडाळेकर, कट्टा शाखेचे अध्यक्ष बापू तळावडेकर, अध्यक्ष शाम पावसकर, कार्यवाह वैष्णवी लाड, ज्योती तोरसकर, दीपक भोगटे, सर्व कार्यकारिणी सदस्य आणि सर्व कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

गोव्यात व्यावसायासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील चालकांवर बॅचच्या नावावर कारवाई

पान १ वरून..

कामाला आहेत. मात्र हा त्रास वारंवार होत असल्यामुळे आता करायचे काय? असा प्रश्न त्यांच्या समोर पडला आहे. याबाबत वारंवार गोवा शासनाचे लक्ष वेधून सुध्दा कारवाईत सातत्य असल्यामुळे १८ हजार पगार आणि कारवाई साडे दहा हजाराची त्यामुळे खायचे काय? असा सवाल त्यांच्याकडून विचारला जात आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवडाभरात आरटीओसह तेथील ट्रॅफिक पोलिस सुध्दा ही कारवाई करीत असल्या मुळे काही दिवस गाड्या बंद ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. यात त्यांच्या गोव्यातील गाड्या मालकांनी त्यांना सहकार्य केले आहे. संबंधित प्रश्नांबाबत आपल्याला न्याय मिळावा यासाठी आज दिडशेहून अधिक चालकांनी आज सावंतवाडी गाठली.

यावेळी त्यांनी तेथील उद्यान परिसरात सर्वजण जमले. यावेळी अमित गवस, संतोष कुबल, अक्षय राऊत, प्रसाद परब, गणपत कळगुटकर, बंटी गावडे, शेखर गायचोर, रोहित गावडे, महेंद्र सावंत, अमित म्हापणकर, कृष्णा नाईक, सिद्धेश्वर पालव, सागर लातये, दीपक जाधव, विश्वनाथ हळदणकर, आकाश कुबल, हर्ष उगवेकर, अमित तुळसकर, संदेश सातार्डेकर, सिद्धेश भाईप, निलेश भोगले, प्रेमानंद नेतर्डेकर, देवेद्र मांजरेकर, प्रवीण राऊळ, अभिजीत गवस, सागर जाधव, रामचंद्र पालव, प्रथमेश पालव सिद्धेश शेर्लेकर आदी चालक यावेळी उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी ॲड.निरवडेकर यांची भेट घेतली. यावेळी निरवडेकर यांनी गोव्याचे आमदार जीत आरोलकर यांच्याशी संपर्क साधून या प्रश्नावर लक्ष वेधले. यावेळी आपण अधिवेशानत आवाज उठवून या प्रश्नावर नक्कीच लक्ष घालू,असे त्यांनी आश्वासन दिले. त्यानंतर या सर्व तरुणांनी ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांची पर्णकुटी विश्रामगृहावर भेट घेतली. यावेळी श्री. राऊत यांनी आपण थेट गोव्याच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू,असे त्यांनी आश्वासन दिले.

यावेळी जिल्हाप्रमुख संजय पडते,तालुकाप्रमुख रुपेश राऊळ,जानवी सावंत,बाबुराव धुरी, शब्बीर मणियार आदी शिवसेना पदाधिकारी तसेच अमित गवस, संतोष कुबल, अक्षय राऊत, प्रसाद परब, गणपत कळगुटकर, बंटी गावडे, शेखर गायचोर, रोहित गावडे, महेंद्र सावंत, अमित म्हापणकर, कृष्णा नाईक, सिद्धेश्वर पालव, सागर लातये, दीपक जाधव, विश्वनाथ हळदणकर, आकाश कुबल, हर्ष उगवेकर, अमित तुळसकर, संदेश सातार्डेकर, सिद्धेश भाईप, निलेश भोगले, प्रेमानंद नेतर्डेकर, देवेद्र मांजरेकर, प्रवीण राऊळ, अभिजीत गवस, सागर जाधव, रामचंद्र पालव, प्रथमेश पालव सिद्धेश शेर्लेकर आदी चालक उपस्थित होते.

कृषीदिनी विविध उपक्रम

वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर

महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून प्रि.एम.आर.देसाई इंग्लिश मिडियम स्कूल येथे रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करून त्यांचे महत्त्व व औषधी गुणधर्म मुलांना पटवून देण्यात आले. यावेळी घेण्यात आलेल्या वेशभूषेत पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांची वेशभूषा साकारली. तर मुलांना रानभाज्या खाण्याची सवय लागावी यासाठी पाककला स्पर्धाही घेण्यात आली. यात आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

थोडक्यात

बेकायदा वाळू वाहतुकीस बांदा पोलिसांचा आशीर्वाद !

बांदा । वार्ताहर

डंपरमधून केल्या जाणाऱ्या अवैध शेकडो ब्रास वाळू वाहतुकीला पोलिसांचा वरदहस्त असून प्रतिडंपर ३०० रुपये हफ्ता चेकपोस्टवरील कर्मचारी घेत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते साईप्रसाद कल्याणकर यांनी केला आहे. तशी तक्रार जिल्हा पोलीस अधीक्षक व लाचलुचपत विभागाकडे करण्यात आली आहे. त्यांनी म्हटले आहे की, बांदा पोलिसांचा इन्सुली चेकपोस्ट अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. काही वर्षांपूर्वी तेथील अनेकांची उचलबांगडीसुद्धा केली होती. मात्र, तरीसुद्धा अवैध धंद्यांना आशीर्वाद सुरुच आहे. चेकपोस्टवरून अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. जिल्ह्यातून होणाऱ्या अवैध वाळू वाहतुकीमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. मात्र, याची महसूल आणि पोलीस विभागाला कोणतीही फिकीर नसल्याचे दिसून येते. वरच्या कमाईसाठी अधिकारी असल्याचे कल्याणकर म्हणाले.

राष्ट्रीय डॉक्टर दिन उत्साहात

वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर

प्रि.एम.आर.देसाई इंग्लिश मिडियम स्कूल येथे प्रि-प्रायमरीच्या मुलांसोबत राष्ट्रीय डॉक्टर दिन उत्साहात साजरा केला. छोट्या मुलांनी डॉक्टरांची वेशभूषा साकारत डॉक्टर सेट घेऊन, एकामेकांना तपासले. डॉक्टरांचे कार्य व त्यांचे आपल्या जीवनातील महत्व विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक कृतीतून समजवून सांगितले. यासाठी मुख्याध्यापिका म नाली होडावडेकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

किनळे माऊली मंदिरात फंडपेटी फोडून रोकड लंपास

सावंतवाडी । प्रतिनिधी

किनळे येथील श्री देवी माऊली मंदिरातील फंडपेटी अज्ञात चोरट्याने फोडून अंदाजे ७ हजाराची रोकड लंपास केली आहे. हा प्रकार आज सकाळी उघडकीस आला. याप्रकरणी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष दिवाकर सातू नाईक यांनी सावंतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

ग्रामपंचायत कार्यालय सांगेली तालुका-सावंतवाडी जिल्हा-सिंधुदुर्ग

gmail- gpsangeli1234gmail.com

जा.क्र. ५३/२०२४-२५ दिनांक : ०५/०७/२०२४

जाहीर निविदा

ग्रामपंचायत कार्यालय, सांगेलीकडून कळविण्यात येते की, खालील कामे मंजूर असून ग्रामपंचायत सांगेलीकडून सदरच्या कामाची निविदा मागण्यात येत आहे.

अ.क्रं.	कामाचे नाव	अ.प. रक्कम	निविदा फी	बयाणा फी
१.	सांगेली देवकरवाडी ते हरिजनवाडी स्त्यानजीक गटार बांधणे व आवश्यक त्या ठिकाणी गटार बंदिस्त करणे. (१५ वित्त आयोग सन २०२३-२४)	१९९६८७/-	२०० + १८% जीएसटी एकूण फी २३६/-	१९९७/-
२.	सांगेली हरिजनवाडी रस्त्यानजीक गटारास झाकण बसविणे. (१५ वित्त आयोग सन २०२३-२४)	४००००/-	१०० + १८% जीएसटी एकूण फी ११८/-	४००/-
३.	सांगेली सनामटेंब रस्त्यास श्री.चंद्रकांत सनाम घरानजीक संरक्षक भिंत बांधणे. (१५ वित्त आयोग सन २०२३-२४)	४९८३१/-	१००+१८% जीएसटी एकूण फी ११८/-	४९८/-
४.	सांगेली सावंतटेंब श्री.अरुण रेडीज यांच्या घराजवळ संरक्षक भिंत बांधणे. (१५ वित्त आयोग सन २०२३-२४)	५०३६८/-	१०० + १८% जीएसटी एकूण फी ११८/-	५०४/-
५.	सांगेली काजरमळा रस्त्या नजीक गटार बांधणे. (१५ वित्त आयोग सन २०२३-२४)	२५९७४४/-	३०० + १८% जीएसटी एकूण फी ३५४/-	२५९७/-
६.	सांगेली सावंतटेंब अंगणवाडी दुरुस्त करणे. (जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४)	२२५९९९/-	२०० + १८% जीएसटी एकूण फी २३६/-	२२६०/-
७.	सांगेली खालचीवाडी अंगणवाडी दुरुस्त करणे. (जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४)	२५००००/-	२०० + १८% जीएसटी एकूण फी २३६/-	२५००/-

सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या मक्तेदाराकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा ग्रा.प. सांगेली कार्यालयाकडे दि. १६/०७/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे. सदर निविदा दि. १८/०७/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय सांगेली येथे उघडण्यात येतील. सदर कामाची बयाणा रक्कम व निविदा फी ग्रा.पं. खाते क्रमांक १५८३८, सि.जि.म.सह.बँक, शाखा सावंतवाडी येथे भरणा करून निविदा सोबत पावती सादर करावी.

निविदाबाबत अटी व शर्ती - कामाच्या अटी व शर्ती सविस्तर वर्णन, ग्रा.प.कार्यालय सांगेली येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

सही/- सरपंच
ग्रामपंचायत सांगेली
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

थोडक्यात

शिष्यवृत्ती परिक्षेत सिद्धी गावडेचे यश

वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली आहे. यामध्ये वेंगुर्ला येथील सिंधुदुर्ग विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूलची विद्यार्थिनी कु.सिद्धी भरत गावडे ही पूर्व माध्यमिक परीक्षेमध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे. या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष इर्शाद शेख, संचालक प्रशांत नेरुरकर, सचिव दत्तात्रय परुळेकर, मुख्याध्यापिका मनीषा डिसोझा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसची सभा

वेंगुर्ले । वार्ताहर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या वेंगुर्ला तालुका व शहर कार्यकारिणीची सभा सोमवार दि. ८ जुलै रोजी सायंकाळी ४ वा.वेंगुर्ला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पार्टीच्या वेंगुर्ला-कॅम्प येथील मध्यवर्ती कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेस शहर व तालुका कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी व सदस्य, माजी नगरसेवक, माजी जि.प., पं.स.सदस्य, सहकारी संस्थांचे पदाधिकारी महिला अध्यक्षा युवक अध्यक्ष, युवती अध्यक्ष, ओबिसी अध्यक्ष सर्व बुथ अध्यक्ष यांनी वेळीच उपस्थित रहावे असे आवाहन तालुका अध्यक्ष योगेश कुबल व शहर अध्यक्ष सत्यवान साटेलकर यांनी केले आहे.

न्यूटन टॅलेंट सर्च परीक्षेत अनिष आरोस्कर तालुक्यात दुसरा

वेंगुर्ले । वार्ताहर

ब्रिलियंट एज्युकेशन सोसायटी मार्फत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घेतल्या गेलेल्या ज्युनिअर न्यूटन टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये वेंगुर्ला येथील सिंधुदुर्ग विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूलचा अनिष अखिल आरोस्कर हा वेंगुर्ला तालुक्यामध्ये दुसरा आला असून याबद्दल त्याला रौप्य पदक, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष इर्शाद शेख, संचालक प्रशांत नेरुरकर, सचिव दत्तात्रय परुळेकर, मुख्याध्यापिका मनिषा डिसोझा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

कुडाळात २६ तलाठ्यांची पदे रिक्त, ३३ जणांवर अतिरिक्त कार्यभार

कुडाळ । प्रतिनिधी

तालुक्यात तब्बल ५९ पैकी २६ तलाठ्यांची पदे रिक्त आहेत. तर ३३ तलाठ्यांकडे अतिरिक्त कार्यभार आहे. त्यामुळे त्याचा फटका ग्रामीण भागातील लोकांना होत आहे. त्यामुळे याची दखल घेऊन तात्काळ ही रिक्त पदे भरा, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हा संघटक रुपेश पावसकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. याबाबत त्यांनी प्रसिद्धी पत्र दिले आहे. त्यात असे म्हटले आहे की, कुडाळ तालुक्यात एकूण ५९ तलाठी सजा आहे त्यातील २६ तलाठी पदे रिक्त आहेत. नियुक्त असलेल्या तलाठ्यावर अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्यामुळे त्याचा फटका सर्वसामान्य ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. वेळेवर कामे होत नाही. त्यामुळे तात्काळ यावर सकारात्मक भूमिका घेऊन ही समस्या दूर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

वासराचं शिर सापडल्यानं परिसरात खळबळ; आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांना ४८ तासांची मुदत

रत्नागिरी । प्रतिनिधी

रत्नागिरीतून मोठ्या प्रमाणात गोमांसाची वाहतूक होत असल्याचा गंभीर प्रकार काल रात्री समोर आला आणि एकच खळबळ उडाली. मिरजोळे रस्त्यावर गोवंशाचे मुंडके आढळल्याने जमाव आक्रमक झाला होता. आरोपींना ४८ तासांच्या आत अटक करु असे आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर जमाव शांत झाला.

अशा प्रकारची वाहतूक करणाऱ्या टेम्पोतून वासराचे अवशेष रस्त्यावर पडल्याने हा प्रकार लोकासंमोर आला. हि घटना समजतात गोरक्षक संस्था आणि गोप्रेमी नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आपला रोष व्यक्त केला. दरम्यान म ोठ्या प्रमाणावर या ठिकाणी नागरिक गोळा झाले व त्यांनी पोलीस प्रशासनाबाबत प्रचंड नाराजी व्यक्त केली. या घडणाऱ्या प्रकारांबाबत यापूर्वी देखील पोलिसांना कल्पना देऊन त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप गोप्रेमी नागरिकांनी आणि सामाजिक संस्थांनी केला आहे.

जोपर्यंत हि वाहतूक करणारा टेम्पो पोलीस शोधून आणत नाहीत तोपर्यंत आम्ही जागेवरून हलणार नाही अशी भूमिका संतप्त नागरिकांनी घेतली. ग्रामीण पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना या ठिकाणी मोठा जमाव गोळा झाला.

उपस्थितांनी घोषणा देण्यास सुरुवात केल्यावर वाढीव पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला. जमावाला शांत करण्यासाठी पोलिसांची जादा कुमक मागविण्यात आली होती. पोलिसांनी नागरिकांशी चर्चा करून त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. याप्रकरणी संबंधितांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले.मात्र, संतप्त

नागरिकांनी हे प्रकार वारंवार घडत असूनही कारवाई का होत नाही, असा प्रश्न विचारला. तसेच या वाहनाचा शोध घेऊन संबंधितावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात आली. नागरिकांचा जमाव रात्री ग्रामीण पोलिस स्थानकावर धडकला होता.

जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी हे देखील ग्रामीण पोलीस स्थानकात दाखल झाले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जमावा मध्ये थोडी वादावादी देखील झाली. आम्हाला या घटनेचा सखोल तपास करण्यासाठी ४८ तासांची मुदत द्या आम्ही संबंधितांवर कठोर कारवाई करू असे आश्वासन पोलिसांकडून दिल्यावर रात्री तीन वाजता जमाव माघारी फिरला.

रत्नागिरीत मोठ्या प्रमाणावर गाईच्या मांसाची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. तीन म हिन्यांपासून काही नागरिक पोलिसांशी संपर्क करण्याचा प्रयत्न करत होते. आवश्यक ती माहितीदेखील देत होते. परंतु अद्यापही ठोस कारवाई होत नव्हती. दरम्यान गुरुवारी घडलेल्या घटनेमुळे नागरिकां मध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रत्नागिरी शहरात आता राजरोसपणे गुरांच्या मासांची वाहतूक होत असल्या मुळे एकच संताप व्यक्त केला जात आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्या आदेशानुसार नाकाबंदी करण्यात आली होती. नव निर्माण कॉलेजच्या इथून हा टेम्पो गेल्याचे प्रथमदर्शनी काहींनी सांगितले. पण हा टेम्पो निसटला. या सगळ्या प्रकारची गंभीर दखल पोलिसांनी घेतली असून पळालेल्या टेम्पोचा व चालकाचा कसून शोध सुरू आहे. रात्री दोन वाजेपर्यंत उशिरापर्यंत रत्नागिरी पोलीस ठाण्यात तळ ठोकून होता. यावेळी घोषणाबाजीदेखील करण्यात आली. अखेर रात्री दोन वाजता हा जमाव शांत होऊन आपापल्या घरी गेला. दरम्यान या सगळ्या गोमांस वाहतूक प्रकरणाची जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी गंभीर दखल घेतली असून युद्धपातळीवर या प्रकरणी तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

बेळणे खुर्द येथे जनावरांचे लसीकरण शिबिर आयोजित!

फोंडाघाट । प्रतिनिधी

ब्राम्हणेश्वर शैक्षणिक सामाजिक उन्नती मंडळ अंतर्गत कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय फोंडाघाट येथील कृषी पदवीच्या अंतिम वर्षातील कृषीदूत यांनी ग्रामीण कृषी जागरुकता व कृषी औदयोगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत बेळणे खुर्द येथे जनावरांचे लसीकरण शिबीर आयोजित केले होते.

आपल्या भारतीय शेती क्षेत्रामध्ये पशूचे असणारे महत्व लक्षात घेऊन त्या पशूचे पावसाळा या ऋतुमध्ये विविध आजारांपासून संरक्षण करण्यासाठी तसेच त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी पशूचे लसीकरण करून घेतले. तसेच त्या लसीकरणाच्या वेळी डॉ. शिरसाट सर यांनी पावसाळ्यात जनावरांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, विविध आजारांपासून प्रादुर्भाव कसा टाळावा याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सदर लसीकरण शिबिराला शेतकऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यासाठी त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य पी.आर.संते आणि कार्यक्रम समन्वयक तथा प्राध्यापक एस.एस.मोटे यांचेही मार्गदर्शन लाभले.

स्टॉल हटाव विरोधात महिलेचा आत्मदाहनाचा प्रयत्न

वैभववाडी । प्रतिनिधी

वाभवे वैभववाडी नगरपंचायतीच्या स्टॉल हटाव कारवाई विरोधात न प च्या कर्मचाऱ्यांसमोर स्टॉल धारक महिलेने अंगावर डिझेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. स्टॉल हटाव मोहिमेच्या विरोधात महिलेने टोकाचे पाऊल उचलले. सदर घटनेची माहिती मिळताच वैभववाडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले पोलीस निरीक्षक सुनील अवसरमोल यांच्यासमोर स्टॉल धारक महिलेने आपली कैफियत मांडली अखेर पोलिसांच्या सहकार्याने स्टॉल धारक महिलेची समजूत काढत त्यांचे सांत्वन केले व सदर घटनेवर तात्पुरता पडदा पडला.

वैभववाडी बाजारपेठेत गेली ४० वर्षापासून स्टॉलमध्ये शिवणकाम करून कुटुंबाच्या उदरनिर्वाह करताना स्टॉल

हटावमुळे माझ्यावर उपासम ारीची वेळ आली तरी शासनाने व्यावसायिका करिता स्टॉल लावण्याची परवानगी द्यावी अशी मागणी स्टॉल धारक अंजली एकनाथ शिवगण यांनी वैभववाडी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

तरी अद्याप नगरपंचायत प्रशासनाने त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून न दिल्याने गेल्या काही दिवसापासून त्यांनी पुन्हा नगरपंचायत जवळील फुटपाथ वर विना स्टॉल उघड्यावर शिलाई मशीन ठेवून त्या आपला व्यवसाय करत होत्या. पावसामुळे उघड्यावर शिलाई काम करणे अशक्य असल्याने त्याने आपला स्टॉल पुन्हा फुटपाथवर मांडून व्यवसाय करण्यास सुरुवात केली होती. शुक्रवारी नगरपंचायत प्रशासन कारवाई करण्यासाठी कर्मचारी स्टॉलच्या समोर दाखल झाल्यानंतर स्टॉल धारक महिलेनी अंगावर डिझेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला ही घटना वैभववाडी पोलिसांना समजताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन स्टॉल धारक महिलेची समजूत काढत तात्पुरता या घटनेवर पडदा पडला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत लक्षवेधी मांडा; जयंत पाटील यांना निवेदन

ओरोस । प्रतिनिधी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा, काजू व भात उत्पादक शेतकऱ्यांच्या कर्ज माफी संदर्भात विधानसभेत लक्षवेधी मांडण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार जयंत पाटील यांचे राष्ट्रवादीच्या कोकण महिला अध्यक्षा अर्चना घारे परब व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी संघटनेने अधिवेशनात लक्ष वेधले आहे.

कर्जमाफी संदर्भात लक्षवेधी मांडून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासंदर्भात मदत मिळावी अशी विनंती ही आमदार पाटील यांना केली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरकारच्यावतीने घोषित केलेल्या कर्जमाफी बाबतची अद्याप पूर्तता करण्यात आली नसून यामध्ये छत्रपती

शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतंर्गत उर्वरित शेतक-यांना लाभ मिळणे, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत २ लाखांवरील शेतकऱ्यांना कर्जमाफी, खावटी कर्जमाफी व खावटी कर्जमाफीची मुदत वाढविणे यासह नियमित कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांना प्रोत्साहनपर अनुदान ५० हजार देण्याबाबत तरतूद आहे. कोकणातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीने देखील अनेक वेळा अडचणीत आलेला असून वरील बाबींवर सरकार कोणताच निर्णय घेत नाही. यावर तत्कालीन सहकार मंत्री अतुल सावे यांनी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात रक्कम जमा करण्याचा निर्णय घेतला होता. याबद्दल सरकारकडून आदेश काढण्यात आला असून ती रक्कम अद्याप पर्यंत शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा झाली नाही. २ लाखावरील थकबाकी असणारे शेतकरी मध्यभूधारक आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात कोणताही निर्णय झाला नसून यामध्ये अनेक शेतकरी कर्जमाफी होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. या सर्व गोष्टी गांभीर्यतेने विचार करून मार्गी लावाव्यात अशी सिंधुदुर्गमधील शेतकऱ्यांची मागणी आहे.

जिल्ह्यातील आंबा, काजू व भात उत्पादक शेतकऱ्यांच्या कर्ज माफी संदर्भात विधानसभेत लक्षवेधी मांडून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासंदर्भात मदत व्हावी अशी विनंती आम दार जयंत पाटील यांच्याकडे करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शामसुंदर राय, सचिव महेश चव्हाण, राष्ट्रवादीचे तुळस विभाग अध्यक्ष अवधूत मराठे, संदीप घारे आदी उपस्थित होते.

नाडण येथील युवकाची गळफास लावून आत्महत्या

देवगड । पांडूशेठ साटम

नाडण कानडेवाडी येथील ३५ वर्षीय विनायक मधुकर कानडे यांचा मृतदेह नाडण माडाची घोवी येथील आंबा आंबा कलम झाडाला गळफास लावलेल्या स्थितीत गुरुवारी ४ जुलै रोजी रात्री ७ वाजता दिसून आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नाडण कानडेवाडी येथे विनायक मधुकर कानडे (३५) राहणार नाडण कानडेवाडी हे नाडण माडाची घोवी येथील स्वतःच्या मालकीच्या कलम बागेत गळफास लावलेल्या स्थितीत गुरुवारी सायंकाळी ७ वाजता दिसून आले. त्यांना तेथून खाली उतरून देवगड ग्राम ीण रुग्णालय येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र देवगड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासून ते मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतची फिर्याद प्रकाश हरी कानडे वय ६५ राहणार नाडन कानडेवाडी यांनी देवगड पोलिसात दिली असून देवगड पोलिसांनी आकस्मिक मृत्यू अशी नोंद केली आहे. याबाबतच्या अधिक तपास पोलीस हवालदार आशिष कदम करत आहेत. मयत विनायक यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, असा परिवार आहे.

दोडामार्ग वीज समस्या बाबत जयंत पाटील यांचे वेधले लक्ष

दोडामार्ग । वार्ताहर

महालक्ष्मी कंपनीची वीज थेट स्वतंत्र फिडर बसवून दोडामार्ग तालुका व शहराला देण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आम.जयंत पाटील यांच्याकडे कोकण विभाग महिला अध्यक्षा सौ.अर्चना घारे परब यांनी निवेदन दिले होते. यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे जयंत पाटील यांनी लक्ष वेधले आहे. सौ. घारे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांना योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती त्यांनी केली आहे. दोडामार्ग शहर आणि तालुका परिसरात कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने तालुक्यातील नागरीक, व्यावसायिक त्रस्त झाले आहेत.

तालुक्यातील कोनाळकट्टा येथे महालक्ष्मी विद्युत प्रा.लि. ही खाजगी कंपनी व राज्य शासनाचे महावितरण विभाग यांच्यात जो करार झाला होता तो संपुष्टात आल्याने त्याचा विपरीत परिणाम वीज वितरणावर होत आहे. सासोली व कोनाळकट्टा या दोन्ही उपकेंद्राचे अंतर ५५ ते

६० कि.मी. असल्याने विद्युत पुरवठा कमी दाबाचा होत आहे. तसेच बरीचशी विद्युत लाईन ही जंगल भागातून येत असल्याने अनेकदा काही कारणाने बिघाड झाल्यास तात्काळ दुरुस्ती करता येत नाही.

वाढती लोकसंख्या व मागणी लक्षात घेऊन महालक्ष्मी कंपनीची वीज थेट स्वतंत्र फिडर बसवून दोडामार्ग तालुका व शहराला देण्याबाबत सौ. अर्चना घारेंनी माजी मंत्री आम. जयंत पाटील यांचे लक्ष वेधले होते. यानंतर सौ. घारे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आपले स्तरावरुन संबंधितांना योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे आम. जयंत पाटील यांनी केली आहे. तसेच निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी असे पत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कोकण विभाग अधीक्षक अभियंता यांनाही आम. जयंत पाटील यांनी दिले आहे. अशी माहिती कोकण विभाग राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) महिला अध्यक्ष सौ. अर्चना घारे - परब यांनी दिली आहे.

कार फोंडाघाटमध्ये अन् साताऱ्यातील टोल नाक्यावर फास्ट टॅगमधून रक्कम कपात

कणकवली । प्रतिनिधी

फोंडाघाट - हवेलीनगर येथील सुरेश यशवंत पेडणेकर यांची कार घरी उभी असतानाही या कारचा टोल टॅक्स सातारा-अणेवाडी टोलनाक्यावर कापण्यात आला. या बाबतचा एसएमएस सुरेश पेडणेकर यांना मोबाईलवर आल्यावर ही बाब लक्षात आली.

या सर्व प्रकारा मुळे पेडणेकर चक्रावून गेले. त्यांनी फास्ट टॅगच्या माध्यमातून वजा झालेल्या टोलची ऑनलाईन तक्रार नोंदवली असून त्याची चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. सुरेश पेडणेकर यांच्या घराचे काम सुरू असल्याने त्यांची कार घरीच असून गेल्या तीन महिन्यात त्यांनी या कारने ३ ते ४ वेळा कणकवली व एकदा सिंधुदुर्गनगरी असा प्रवास केला. त्यांच्या कारला एसबीआयचा फास्ट टॅग आहे. २ जुलै रोजी सकाळी त्यांच्या मोबाईलवर मसेज आला. सातारा-अणेवाडी टोल प्लाझावर १ जुलै रोजी ८० रु. डेबिट झाल्याचा तो मेसेज होता. हा मेसेज वाचून पेडणेकर यांना धक्का बसला. कार फोंडाघाट येथे घरी उभी असताना कारचा फास्ट टॅग अणेवाडी टोल प्लाझा येथे स्कॅन कसा झाला? हा मोठा प्रश्न आहे. त्यांच्या कारच्या फास्ट टॅगवरुन ८० रु. टोल टॅक्स कापून गेल्याचे स्पष्ट दिसत आहे. जर आपली कार कुठे फिरलेलीच नाही तर कारवरील फास्ट टॅग स्कॅन होण्याचा प्रश्नच नाही. यामुळे हा काहीतरी फ्रॉड आहे हे निश्चित होते.

पेडणेकर यांनी या प्रकरणी कणकवली पोलिस स्टेशन येथे तक्रारीबाबत चौकशी केली. तेथून कसाल हायवे पोलिस नाका येथे संपर्क करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर एसबीआय फास्ट टॅग कस्टमर सर्व्हिसला फोन करुन त्यांच्या सूचनेप्रमाणे त्यांच्याकडे ऑनलाईन तक्रार केली. जी गाडी टोल प्लाझापासून सुमारे २५० कि.मी. दूर असलेल्या गाडीचा रात्री ११.५९ वा. फास्ट टॅग कसा काय स्कॅन होऊ शकतो ही आश्चर्याची बाब आहे. प्रकाराबाबत ज्याच्याकडून ही गंभीर चूक झाली आहे. त्याला कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. अनेक सदोष यंत्रणांमुळे सामान्य नागरिकांना नाहक आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास दिला जात असल्याचा संताप सुरेश पेडणेकर यांनी प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केला आहे.

स्कॉलरशिप परिक्षेत बांदा येथील नाबर शाळेचे यश

सावंतवाडी । सुनिता भाईप

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत १८ फेब्रुवारी रोजी पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत बांदा येथील व्ही.एन. नाबर मेमोरियल इंग्लिश मिडीयम स्कूल मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून ह्या शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ करून शाळेला चांगली सुरूवात करून दिली आहे.

यामध्ये इयत्ता पाचवी मध्ये कु.चैतन्य मनोज महाबळ व कु.माधव सुधाकर डेगवेकर तर आठवीतील कु.अनुष्का रामचंद्र तेली व कु.सुयश संदिप गावकर या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परिक्षेत घवघवीत यश संपादन

करून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.यामध्ये पाचवीचा इंग्लिश विषय शिक्षिका लविना डिसोझा,गणित शिक्षिका सौ. स्नेहा नाईक, इंटेलिजन्स विषय शिक्षिका सौ.शिल्पा कोरगावकर तर मराठी विषयासाठी शिक्षिका सौ. दिक्षा नाईक यांनी मार्गदर्शन केले.

तर इयत्ता आठवीसाठी शिक्षिका सितारा मांद्रेकर तसेच श्री.निरंजन आरोंदेकर , गणितासाठी शिक्षिका रसिका वाटवे, इंटेलिजन्ससाठी मुख्याध्यापिका सौ. मनाली देसाई तर मराठी साठी शिक्षिका सौ. कल्पना परब या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन श्री.मंगेश कामत, मॅनेजर श्री. त्रिविक्रम उपाध्ये, सेक्रेटरी श्री.बी. सातारकर ,पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री.राऊळ, शाळेच्या मुख्याध्यापिका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच शाळेचे हितचिंतक यांनी या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे व शाळेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.